श्री./श्रीमती/सौ. **सुभाषचंद्र क्रीष्णलाल देबनाथ** यांचा तारीख **११/०५/२०१६** रोजी परवानगी मिळणेकरिता केलेला अर्ज.

---

क्रमांक - चंशमनपा/न.र./बां.पर./**३६**/२०१६

दिनांक - ०५ / १२ / २०१६

# चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर.

## ☆ प्रारंभ - प्रमाणपत्र ☆

**(महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४४ व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम २५३ अन्वये)**

श्री/श्रीमती/सौ. **सुभाषचंद्र क्रीष्णलाल देबनाथ,** मौजा/मोहल्ला **वडगांव,** सर्व्हे/शिट क्र. **१०२ पैकी,** ब्लॉक क्र. ---- प्लॉट क्र. **११** या चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या हद्दीतील आपले मालकीचे कब्जातील जागेत ---------------------------- रंगात आराखडयामध्ये दुरुस्ती दर्शविल्याप्रमाणे **निवासाकरीता (फ्लॅट स्किमचे प्रस्तावित बांधकाम)** ईमारतीचे बांधकामास पुढील अटी शर्तीस अधीन राहुन बांधकामास परवानगी देण्यांत येत आहे.

**ईमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार व सेवाशर्ती नियमन) अधिनियम १९९६ तसेच ईमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर नियम १९९८ अंतर्गत उपकराचा युनिक क्रमांक** -

| | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ० | १ | ६ | ३ | ३ | ३ | ३ | २ | ० | ३ | ० | ० | ३ | ६ | ० | ० |

## -- अटी व शर्ती --

१) सदरचे प्रमाणपत्र निर्गमित केलेल्या तारखेपासून एक वर्ष वैध असेल. मुदतीत बांधकाम पूर्ण न झाल्यास परवानगीची
मुदत वाढविणेसाठी विहीत मुदतीत मुदतवाढ प्राप्त करुन घ्यावी.

२) सदरहू बांधकामामुळे भविष्यांत महानगरपालिकेच्या विकास आराखडयामध्ये अगर अन्य कोणत्याही सार्वजनिक कार्यास अडथळा/ बाधा निर्माण झाल्यास बांधकाम तुमचे खर्चाने काढून घ्यावे लागेल. त्या बद्दल नुकसान भरपाई मिळणार नाही.

३) बांधकाम मंजूर केलेल्या आराखडयाप्रमाणे आणि नमुद अटी प्रमाणे करणे बंधनकारक राहील.

४) बांधकामाचे मटेरियल (जसे - बांधकामाची रेती, गिट्टी, विटा) सार्वजनिक ठिकाणी महानगरपालिकेच्या स्वतंत्र लेखी परवानगी शिवाय टाकलेले आढळून आल्यास त्यापोटी विहीत शुल्क जमा केले शिवाय ज्योत्यानंतरची पुढील परवानगी दिली जाणार नाही.

५) बांधकाम पक्क्या स्वरुपाचे करणे आवश्यक राहील. बांधकामामध्ये हलके मटेरियल, गवत, गारा, वगैरे वापरता येणार नाही.

६) इमारतीचे सांडपाणी महानगरपालिकेची गटार लगत असल्यास महानगरपालिकेचे गटारीस महानगरपालिकेची लेखीपुर्व परवानगी घेवून रितसर अनामत व सांडपाणी जोडणी शुल्क रक्कम भरुन सोडावे. लगत गटार नसल्यास स्वतःचे मालकीचे जागेतच सोकपीट बांधून ती व्यवस्था करावी. व लगतच्या इतर भुखंडावरील विहीर, बोरींग इ. जलस्त्रोत विचारात घेऊन त्यापासुन किमान ६ मि. अंतरावर सोकपीटची जागा ठरवावी कोणत्याही सार्व. ठिकाणी अथवा इतरांचे जागेत सांडपाणी सोडल्याचे आढळून आल्यास सदर परवानगी रद्द झाल्याचे समजण्यांत येईल.

७) मंजूर प्लॅन प्रमाणेच बांधकाम करावे. त्याव्यतिरिक्त जादा बांधकाम अथवा कोणतेही बदल केल्याचे निदर्शनास आलेवर महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील तरतुदीनुसार निष्कासनाची कारवाई करण्यांत येईल. व गुन्हा दाखल करणे तसेच दंड व निष्कासनाचा झालेला खर्च अर्जदाराकडून जमीन महसूल थकबाकी वसुली प्रमाणे केला जाईल.

८) घरांत जाणे येणे करीता महानगरपालिकेचे गटारावर स्लॅप टाकणे आवश्यक असल्यास ती गटारीची रुंदी इतका रुंद व तीन फुट लांब असा महानगरपालिकेचा रस्ता अलग सडक यांचे लेव्हल बरोबर घालावा. त्यापेक्षा जास्त वर येता कामा नये. सदर स्लॅप करीता जादा भाडेपट्टी म.न.पा.कडे भरावी लागेल. याबाबत महानगरपालिकेची अलग रितसर परवानगी घेतली नाही तर म.न.पा. मार्फत केंव्हाही निष्कासन केले जाईल.

९) सदरहू प्लॉटमध्ये कमीत-कमी नविन दहा झाडे लावावी. व सदरची झाडे जतन करावी व त्याची खात्री पटवावी त्याशिवाय बांधलेल्या जागेचा वापर सुरु करण्यासाठी परवानगी दिली जाणार नाही.

१०) बांधकाम पूर्ण झाल्यावर म.न.पा. कडुन बांधकाम पूर्णतेचा दाखला व बांधलेल्या जागेचे वापर प्रमाणपत्र घेतल्याशिवाय वापर सुरु करु नये. तसे आढळून आल्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील तरतुदीनुसार अनाधिकृत वापर बाबतची कारवाई करण्यांत येईल.

११) कोणत्याही परिस्थितीत बांधकाम बंद करण्याचा अगर चालू करण्याचा अधिकार आयुक्त यांनी राखून ठेवला आहे.

१२) रेनवॉटर हर्वेस्टींग करीता इमारतीचे छतावर पडणारे पावसाचे पाणी बाहेर वाहून नेणारा ६ (सहा इंच) व्यासाचा सछिद्र पि.व्ही.सी. पाईप हा कमीत कमी ३० फुट जमिनीचे आंत बोअर करुन टाकण्यात यावा. जेणे करुन छतावर पडणारे पावसाचे पाणी जमिनीत जिरवता येवून जमिनीखालील पाण्याची पातळी उंचविण्यास मदत होईल. सदरची खात्री पटवावी अन्यथा वापर परवानगी दिली जाणार नाही. सदर व्यवस्था केली नसल्याचे आढळून आल्यास आपणांस दिलेली बांधकाम परवानगी रद्द झाल्याचे समजण्यात येईल.

१३) जोत्यानंतरचे (प्लिंथ) बांधकाम झाल्यावर म.न.पा.कडे पुढील बांधकामासाठी परवानगी मिळणेसाठी अर्ज करावा. जोत्यानंतरची बांधकाम परवानगी घेतलेली नसल्यास इमारत अनाधिकृत समजण्यात येईल.

१४) सदर बांधकामात शक्यतो फ्लॉय ॲश विटा व फ्लॉय ॲश आधारित साहित्याचा वापर केला असले बाबत म.न.पा.ची खात्री पटविल्या शिवाय पुढील परवानगी मिळणार नाही.

१५) सौर उर्जेचा वापर प्रभाविपणे होण्याचे दृष्टीने गरम पाणी करण्याचे उपकरणे **B/S** स्पेसीफीकेशन **IS 2933** प्रमाणे इमारतीवर बसविणे आवश्यक राहील त्याबाबत म.न.पा.ची खात्री पटविल्या शिवाय पुढील वापर प्रमाणपत्र मिळणार नाही.

१६) सदर बांधकाम परवानगीची प्रत बांधकाम सुरु असे पर्यंत बांधकाम स्थळावर सहज दिसेल अशा ठिकाणी लावण्याची जबाबदारी अर्जदारावर राहील.

१७) सार्वजनिक वापराच्या सर्व कार्यालयीन तसेच संस्थात्मक इमारती मध्ये अपंग नागरिकांना प्रवेश करण्यासाठी पायऱ्या शेजारी पुरेशा रुंदीचा व योग्य उताराचा रैम्प बांधने आवश्यक राहील. आधाराकरीता रेलींग व्यवस्था करावी, तसेच अंध नागरिकांसाठी ब्रेल लिपीत सुचना फलक लावणे आवश्यक राहील.

१८) सदर इमारत पुर्ण झाल्यानंतर त्याचा वापर करणाया नागरिकांनी घनकचरा व्यवस्थापन नियम २००० अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे ओला व सुखा कचरा वेगवेगळा साठवून विल्हेवाट लावणेची आहे. विशेषतः अपार्टमेंट / वाणिज्य इमारती मधील ओला व सुखा कचरा विल्हेवाट लावणेसाठी जागा व तंत्रज्ञान निश्चीत करुन त्या प्रमाणे काम केलेली खात्री पटवावी त्याशिवाय पुढील परवानगी मिळणार नाही. अशी व्यवस्था केली नसल्यास दंडात्मक कारवाई केली जाईल.

१९) पिण्याऐवजी इतर कारणासाठी पाण्याचा पुर्नवापर करण्याच्या दृष्टीने आवश्यक ती पाईपलाईन व पाणी साठवण यंत्रणा उभारणे आवश्यक राहील.

२०) सदर बांधकाम करतेवेळी भारतीय मानक संस्थेने निश्चीत केलेल्या मानक क्र. **IS** १८९३/१९८४, **IS** ४३२६/१९९३, **IS** १३८२७/१९९३, **IS** १३८२८/१९९३, **IS** १३९२०/१९९३, **IS** १३९३५/१९९३ प्रमाणे भुकंप रोधक बांधकाम करुन त्या प्रमाणे अनुज्ञाप्ती बांधकाम अभियंताकडून प्रमाणपत्र घेऊन पुर्णत्वाच्या दाखल्यासोबत सादर करणे बंधनकारक राहील.

२१) अग्नीशामन व्यवस्था नियमाप्रमाणे करणे व त्याबाबत नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणे अर्जदारावर बंधनकारक राहील.

वरील पैकी कोणत्याही अटीचा भंग झाल्याचे निदर्शनास आल्यावर सदरची परवानगी रद्द समजण्यात येईल व त्याची संपूर्ण जबाबदारी अर्जदारावर राहील व त्यापोटी कोणतीही नुकसान भरपाई म.न.पा कडून देय राहणार नाही.

ठिकाण : **चंद्रपूर**

दिनांक : ०५ / १२ / २०१६

आयुक्त
चंद्रपूर शहर महानगरपालिका,
चंद्रपूर

प्रत -

०१) कर अधिक्षक, चंद्रपूर शहर महानगरपालिका,चंद्रपूर, यांना कर आकारणी करणेची कार्यवाही सुरु करणे करीता.

०२) **श्री. हजारे** क्षेत्रीय अधिकारी यांना माहितीस तसेच सदर बांधकाम मंजूर नकाशानुसार होईल याची खबरदारी घेणेसाठी तसेच कर विभागाकडे कर आकारणीसाठी माहिती सादरकरणे करीता.

**प्रमाणपत्र**

पावती / चलान क्र. 8813 जी.आर एन MH00
क्रं. 6711905201617E दिनांक. 14-12-2016
अन्वये रुपये 1,68,900/- अडुसष्ट हजार नउशे रु.
(अक्षरी) एक लाख ~~एकोणसत्तर~~
एवढे मुद्रांक शुल्क हे रोखीने / दर्शनी
धनाकर्षाव्दारे/ईचलानाद्वारे भरण्यात आले.

सह दुय्यम निबंधक
चंद्रपूर

THE SEAL OF THE SUB-REGISTRAR CL-2 * CHANDRAPUR *

१) मिळकतीचे स्वरुप : मौजा वडगांव, त. सा. क्रमांक- ११, तहसिल व जिल्हा चंद्रपुर येथील, परिवर्तीत सर्व्हे नं. १०२ पैकी,

२) क्षेत्र : परिवर्तीत आराजी ४२९.१३ चौ. मि. खाली जागा.

३) लावलेला दर : रुपये ६३३०/- प्रति चौ. मी. प्रमाणे,

४) बाजारमुल्य दर तक्त्यातील मुल्य विभाग/उपविभाग क्र. ५.२६३ नुसार पान नं. ६९

५) रकाना क्रमांक :

६) इतर आदेशाचा संदर्भ घेतला असल्यास त्याचा क्रमांक :

**विक्रीपत्र किंमत रूपये २८,१४,०००/-**

**बाजारमुल्य तक्त्याप्रमाणे किंमत रूपये २७,१७,०००/**

**मुदांक शुल्क रूपये १,६८,९००/-**

CND
४६८४ / २०१६

THE SEAL OF THE SUB-REGISTRAR * CHANDRAPUR *

याची चतु:सीमा येणे प्रमाणे :-

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस | :- | भु. कं. १०७ ची जमीन, |
| पश्चिमेस | :- | ९ मिटरचा रोड, |
| उत्तरेस | :- | प्लॉट नं. १३ आणि |
| दक्षिणेस | :- | भु. कं. १०१ ची जमीन. |

मा. उपविभागीय अधिकारी साहेब, चंद्रपूर यांचा रा.मा. क्रमांक- ३२/एन. ए.पी. - ३६/२०१०-२०११, मौजा वडगांव मधील आदेश पारीत दिनांक- १६/१२/२०१० नुसार निवासाचे उपयोगाकरीता परीवर्तीत झालेली आहे.

उपरोक्त वर्णनाची प्लॉटची खाली जागा मी दिनांक- २/११/२०१२ चे रजि. विक्रीपत्र नोंदणी क्रमांक- ७७१५ अन्वये श्री. जितेंद्र प्रेमजीभाई ठक्कर, राहणार चंद्रपूर यांचेपासून स्वत: विकत घेतली आहे. यानंतर मी महानगरपालिका चंद्रपूर यांचेकडून या जागेवर बहुमजली ईमारत बांधण्याची परवानगी दि. ५/१२/२०१६ रोजी घेतली आहे. तीच प्लॉटची खाली जागा मी तुम्हांस या विक्रीपत्रान्वये आज रोजी विक्री केली आहे. प्रारंभ प्रमाणपत्र सोबत जोडले आहे.

आज दिनांक-१४/१२/२०१६ ईसवी रोजी खास चंद्रपुर मुक्कामी विक्रीपत्र लिहून देतो ऐसाजे की, मी तुमचेपासुन घेतलेल्या विक्रीच्या भरण्याचे रकमेच्या मोबदल्यात, मी माझे स्वसंपादीत मालकीची, कब्जातील व माझे नावांनी पटवारी रेकार्डला दर्ज असलेली उपरोक्त वर्णनाची खाली जागा, मी तुम्हांस या विक्रीपत्रान्वये हमेशासाठी कायमचे मालकी हक्काने वंशपरंपरेने अनुभव व उपभोग घेण्यास विक्री केली असून, तीचा कब्जाही मी तुम्हांस आजच मोक्यावर दिलेला आहे व तो तुम्ही घेतलेला आहे. तीचा तुम्ही, तुमचे मर्जीनुसार मालकी हक्काने वहीवाट व विल्हेवाट करावी.

मी तुम्हांस विक्री केलेल्या मालमत्तेवर बांधकाम करण्याकरीता मा. महानगरपालिका, चंद्रपूर यांच्याकडे प्रस्तावित बांधकामाचा नकाशा सादर केला असून महानगरपालिका चंद्रपूरचे पत्र क्र. चशमनपा/नर/बापर/३६/२०१६, दि. ०५/१२/२०१६ नुसार बांधकामास मंजुरी दिली असून आपण या खरेदी केलेल्या जागेवर या बांधकाम मंजुरी नकाशाप्रमाणे स्वत:च्या जबाबदारीवर बांधकाम करू शकता. याकरीता माझी कोणत्याही प्रकारची उजर तक्रार राहणार नाही.

यावरील माझी व माझे कायदेशीर इस्टेट वारसानांची आजपावेतो असलेली व भविष्यात प्राप्त होणारी सर्व प्रकारची मालकी हक्क या विक्रीपत्रान्वये कायमचे नष्ट झालेले असुन, ते सर्व मालकी हक्क तुम्हांस या विक्रीपत्रान्वये प्राप्त होवुन तुम्ही तीचे एकमेव कायदेशीर मालक झाले आहात. याची दाखल खारीज तुम्ही तुमचे नांवे सर्व कागदोपत्री पटवारी रेकार्ड व इतर संबंधीत सरकारी रेकार्डला दर्ज करुन घ्यावी. त्यास मी तुम्हास पूर्ण ते सहकार्य देवु. उपरोक्त जागेचा यापुढे येणारा परीवर्तीत सारा व इतर अन्य कर तुम्हास भरावा लागेल.

तुम्हास विक्री केलेली प्लॉटची जागा मी किंवा माझे इस्टेट वारसानांनी इतर कोणासही व कोठेही गहाण, विक्री, बक्षिस वा अन्य त-हेने हस्तांतर वगैरे केलेली नसून, यावर कोणाचे कर्ज वा बोझा मुळीच नाही. तसे काही निघाल्यास वा आढळुन आल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी माझेवरच राहील. तुमचेवर मुळीच राहणार नाही.

या मिळकतीवर कुठल्याही न्यायालयात कुठल्याही कायदया अंतर्गत अथवा मालकी हक्कासंबंधी कुठलेही प्रकरण न्याय प्रविष्ठ नाही किंवा कुठल्याही न्यायालयाचा सदर मालमत्ता विकणे संबंधी स्थगनादेश नाही.

.. ४ ..

CND ४६४४ ४७६ 2016

SEAL OF THE SUB-REGISTRAR CHANDRAPUR